**Pimpri Chinchwad Police Commissionerate**

# प्रेसनोट

## चार वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीस दरोडा विरोधी पथकाकडुन अटक.

माननीय वरिष्ठांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पाहिजे फरार आरोपीतांना अटक करणेबाबत आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे यांनी पथकातील अंमलदार यांना पाहिजे फरारी आरोपीतांचे आस्तित्वाबाबत माहिती प्राप्त करून, तांत्रिक विश्लेषनाद्वारे तपास करून, त्यांना अटक करणेबाबत मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्याप्रमाणे पोना १४५८ बनकर व पोना १५०६ माने यांनी गोपनीय बातमीदारामार्फत पाहिजे / फरारी आरोपीतांचे मोबाईल क्रमांक प्राप्त केले. सदर मोबाईल क्रमांकाच्या आधारे पोना १२३४ कांबळे यांना तांत्रिक विश्लेषनाद्वारे माहिती प्राप्त झाली की, एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुरनं २४१/२०१६ भादवि कलम ३६३, ३६६(अ), ३७६, बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम सन २०१२ चे कलम ३,४,५ (एल), ६ या गुन्हयातील फरारी **आरोपी जितेश तानाजी माने हा तासगाव, सांगली** येथे असलेबाबत माहिती मिळाली. सदरची बातमी त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. उत्तम तांगडे यांना कळविली असता, त्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे दिनांक १८/०८/२०२१ रोजी दरोडा विरोधी पथकातील अंमलदार **पोना १२३४ कांबळे, पोना १४५८ बनकर व पोना १५०६ माने** असे तासगाव, जि. सांगली येथे जावुन, आरोपीचे आस्तित्व असलेल्या परिसरात सहा तास सापळा लावुन, फरार आरोपी नामे **जितेश तानाजी माने, वय २५ वर्षे, रा. कैलास लॉजचे पाठीमागे, तासगाव, सांगली** यास स्थानिक पोलीसांचे मदतीने ताब्यात घेतले.

फरार आरोपी जितेश माने याने दिनांक ०२/०८/२०१६ रोजी फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हिचेसोबत प्रेमाचे खोटे नाटक करून, लग्नाचे खोटे आमिश दाखवुन, फुस लावुन पळवुन नेवुन तिच्यावर अनेकवेळा अत्याचार केल्याचे निष्पन्न झाल्यावरून **एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुरनं २४१/२०१६ भादवि कलम ३६३, ३६६(अ), ३७६, बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम सन २०१२ चे कलम ३,४,५ (एल), ६** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आला होता. सदर गुन्हयात आरोपीस अटक झाली होती. तदनंतर त्यास मा. न्यायालयाने जामीनावर मुक्त केले होते. जामीनावर सुटल्यानंतर नमुद आरोपी हा न्यायालयीन प्रक्रियेकरीता हजर राहत नसल्याने, मे. श्री. ए. वाय. थत्ते, अति. जिल्हा न्यायाधिश सो, पुणे यांनी त्यास जाहिरनामा काढुन फरार घोषीत केले होते. तेव्हा पासुन तो पोलीसांना गुंगारा देत होता.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त श्री प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे, सहा. पोलीस निरीक्षक सिध्देश्वर कैलासे, तसेच पोलीस अंमलदार प्रविण कांबळे, प्रविण माने, आशिष बनकर व विक्रांत गायकवाड यांचे पथकाने केली आहे.

**(सुधीर हिरेमठ)**
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पिंपरी-चिंचवड